O/W-MKNS/ 23-24, 052

MANSUKHBHAI KOTHARI NATIONAL SCHOOL

UNITED WE STAND

Date:- 13/07/2023

To
District Education Officer (Primary),
Pune Zilla Parishad, Pune

Sub: - Permission of State and NOC of state for Mansukhbhai Kothari National Schoolobtained in accordance to the GR dated 20/06/2012.

Respected Madam,
Warm Greetings!
With regards to the above-mentioned subject, we most humbly submit,
That, Mansukhbhai Kothari National School had applied to the State Government of Maharashtra for Permission of State in accordance with the procedure prescribed in the GR dated 20/06/2012. The copy of the said GR is attached for your kind perusal.
That, in accordance with the procedure prescribed the Letters were issued by the State, Deputy Director Education and the District Education Officer ZillaParishad Pune. The copies of all these letters are attached for your kind perusal.
That, at that particular time the Self-Financed School Act was not notified. So, the process prescribed for Self- Financed School was not applicable to our school.
We most humbly request you to consider the above -mentioned facts and refer the attached documents and process the application for Self-Recognition of our school at the earliest.

Thank You and Kind Regards

Chairman
School Management Committee

Encl:-

1. Edu.Dy.Director/Sec/NOC/Pune zone dated 7th Dec 2012
2. Permission-2012(147/12)Mashi-5 dated 21st Dec 2012
3. Z.P.Edu/Primary/Private Preschool dated 28th March 2023
4. NOC 2009/(663/09)/Mashi-1 dated 20th June 2012

**MANSUKHBHAI KOTHARI NATIONAL SCHOOL**
H & M Royal, Sr. No.19, Kondhwa (Bk), Opp. Talab Factory, Pune - 411048. | Tel.: +91 20 26951111 / 1112 | Mob.: +91 86054 04256

जा.क्र. शिउसं/माध्य ३/१५/नाहप्र,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक: 7 NOV 2012

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२

विषय : सीबीएसई या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होणा-या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित तत्वावरील शाळेला परवानगी देणेबाबत. शारदा मनसुखलाल कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट व्दारा संचलित कोठारी नॅशनल स्कूल,कोंढवा बुद्रुक ता हवेली जि. पुणे.

संदर्भ : १. सचिव, शारदा मनसुखलाल कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट यांचे पत्र दिनांक

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई शासन निर्णय क्र.नाहप्र/२००९/(६६३/०९) माशि-१ दिनांक २०.६.२०१२

३. शासन पत्र क्रमांक हेतूप-२०१२ (१६/१२) माशि-५ दिनांक २५..१०.२०१२

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयांनुसार अध्यक्ष शारदा मनसुखलाल कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट व्दारा संचलित कोठारी नॅशनल स्कूल,कोंढवा बुद्रुक ता हवेली जि. पुणे. ही सीबीएसई मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नीत होणा-या कायम विनाअनुदानित तत्वावरील इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी आपणाकडील संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये हेतूपत्र प्राप्त झाले आहे.

शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ च्या तरतूदीनुसार शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत परिशिष्ट क नुसार माहिती शिफारशीसह सादर करण्यांत येत आहे.

सदर प्रकरणी आपल्या स्तरांवरुन योग्य ते आदेश निर्गमित व्हावेत ही विनंती.

आपला विश्वासू

(बी.डी.फडतरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

सोबत : परिशिष्ट क नुसार शाळा तपासणी अहवाल

महाराष्ट्र शासन

क्रमांक:मान्यता-२०१२/(१४७/१२)/माशि-५
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २१ डिसेंबर, २०१२.

प्रति,

अध्यक्ष / सचिव,
शारदा मनसुखलाल कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट,
१६/७२, सिव्हील लाईन्स्,
कानपूर-१.

विषय :- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी शाळांना परवानगी देणेबाबत.
**शारदा मनसुखलाल कोठारी चॅरीटेबल ट्रस्ट, कानपूर द्वारा संचालित कोठारी नॅशनल स्कूल, कोंढवा बु., ता.हवेली, जि.पुणे.**

संदर्भ :- १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) शासनाचे दिनांक २५.१०.२०१२ चे हेतूपत्र.
३) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे दिनांक ०७.११.२०१२ चे पत्र.

संदर्भ क्रमांक १ अन्वये राज्यात सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.एस.ई./ सी.आय.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्या नंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter Of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पुर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक ३ अन्वये प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या **कोंढवा बु., ता.हवेली, जि.पुणे** या ठिकाणी सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या इयत्ता १ ते १२ वी पर्यंतच्या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून शासन **परवानगी** देत आहे.

१) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.
२) सदर शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.
३) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारण असणे आवश्यक आहे.
४) संस्थेने सदर शाळेला शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
५) संस्थेने सदर शाळेसाठी स्वतंत्र क्रिडांगणाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

9

६) संस्थेने सदर शाळेत मुख्याध्यापक पद महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र.३(१) (ब) नुसार पात्र व्यक्तिची नियुक्ती करावी.

७) संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नियुक्त करावा.

८) संस्थेने सदर शाळेत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्त्या करताना बिंदु नामावलीनुसार करण्यात याव्यात.

९) संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

१०) संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

११) संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर, क्रिडा साहित्य, कार्यानुभव साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

१२) संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करावी.

१३) मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय असावी.

१४) संस्थेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१५) शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्याचे शाळेने थांबिवले आहे असे निदर्शनास आल्यास शाळेची मान्यता महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम १२ नुसार काढून घेण्यात येईल.

१६) शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्याच्या आत परवानगी दिलेल्या ठिकाणी शाळा सुरु करेल.

१७) शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे. त्याठिकाणी १८ महिन्याच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

१८) शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील कलम १८ च्या अनुषंगाने नियम २०११ मधील नियम ११ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती पूर्ण केल्यावर जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे यांचेकडून शाळेला मान्यता घेणे आवश्यक राहील.

१९) जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), पुणे यांनी शाळेस मान्यता दिल्यावर संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करेल.

(विनोद बोंदरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे.

निवड नस्ती, माशि-५, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा /४३९ /२०१३
पुणे १ दिनांकः- २८/०३/२०१३

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
शारदा मनसुखलाल कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट, कानपूर द्वारा संचलित,
कोठारी नॅशनल स्कूल, कोंढवा बु.,
ता.हवेली, जि.पुणे

विषय :- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाशी संलग्नित कायम विना अनुदान तत्वावर इंग्रजी शाळेला मान्यताबाबत.

संदर्भः- १. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/६६३ /०९) /माशि-१ दि.२०/०६/२०१२
२. शासनाचे दिनांक २५/१०/२०१२ चे हेतुपत्र.
३. शासनाचे पत्र क्र. मान्यता-२०१२/(१४७/१२/माशि-५ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ दि.२१/१२/२०१२.
४. मा.शिउसं यांचे कडील पंत्र दिनांक ०७/११/२०१२

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्र. ३ च्या अन्वये पत्राच्या अनुषंगाने **शारदा मनसुखलाल कोठारी चॅरिटेबल ट्रस्ट, कानपूर** यांनी **कोठारी नॅशनल स्कूल, कोंढवा बु., ता.हवेली, जि.पुणे** येथे सुरु केली आहे. सदर शाळा सहितेनुसार आवश्यक बाबींची पूर्तता करीत आहे. तसेच शाळा बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम ११, पोट नियम (४) मधील विधीत केलेल्या अटी व शर्ती पुर्ण करीत आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ अनुसार आपल्या संस्थेच्या **कोठारी नॅशनल स्कूल, कोंढवा बु., ता.हवेली, जि.पुणे** या शाळेला मान्यता देणेत येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१. मा. सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहिती करीता सादर
२. मा. शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे -१.
३. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१

सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीसीएसई,
सीआयई इत्यादी देशातील व विदेशातील मंडळांच्या
अभ्यासक्रमाशी संलग्नित होणा-या इंग्रजी
माध्यमांच्या शाळांना कायम विना अनुदान तत्त्वावर
परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

शासन निर्णय क्र. नाहप्र २००९/(६६३/०९)/माशि-१

दिनांक:- २० जून, २०१२

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.नाहप्र२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक ७ ऑगष्ट २००९

२) शासन शुद्धीपत्रक क्र. नाहप्र२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २९ एप्रिल २०१०

**प्रस्तावना:** सीबीएसई (Central Board of Secondary Education), आयसीएसई (Indian Council of Secondary Education), आयबी (International Baccalaureate), आयजीसीएसई (International General Certificate of Secondary Education), सीआयई (Cambridge International Examination) इत्यादि देशातील तसेच विदेशातील शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या कायम विना अनुदान तत्त्वावर शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यासंदर्भात संदर्भाधीन दिनांक ७ ऑगष्ट, २००९ आणि दिनांक २९ एप्रिल २०१० अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. या दोन्ही शासन निर्णयातील तरतूदींच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. २१५७/२०१० दाखल करण्यात